नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

**दिनांक २१/१०/२०२२ (शुक्रवार)**

**(दुपार)**

---

## अपघातात मृत्यु

**१) पो.स्टे. बोरी** :– अंतर्गत ०३ कि. मी. अंतरावरील मौजा मोहगाव डिआरडीओ कॅम्प येथे दिनांक २०/१०/२२ चे ०५.३० वा. सुमारास फिर्यादी नामे– देवानंद महादेव रामटेके वय ४२ वर्ष, रा. वार्ड क्र ०३ रूईखैरी बुटटीबोरी ता. जि.नागपूर यांचा लहान भाऊ अजय महादेव रामटेके (मृतक), वय ३४ वर्ष हा कंपनीचे बाहेर निघुन पाई चालत असतांना त्यास अज्ञात वाहनाचे चालक आरोपीने त्याचे वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन त्यास धडक दिली. या अपघातात तो गंभीर जखमी झाल्याने त्यास उपचाराकामी नेले असता वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासून मृत घोषीत केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन बोरी येथे आरोपी चालकाविरुध्द कलम २७९, ३०४ अ भादवी सहकलम १८४,१३४,१७७ मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास मपोउपनि उघडे मो.क ८३५५९४७४७३ या करीत आहे.

**२) पो.स्टे. कळमेश्वर** :– अंतर्गत ०२ कि. मी. अंतरावरील खडक नदीच्या पुलावर ब्राम्हणीशिवार येथे दिनांक २०/१०/२२ चे १२.०० वा. सुमारास फिर्यादी नामे– गणेश आंनदराव आत्राम वय ५८ वर्ष, रा. प्लॉट नं. १५९ ट्रस्ट ले–आउट पांढराबोडी नागपुर हा त्याची एमएच– ३१/एव्ही– ४८५३ क्रमांकाच्या मोपेड गाडीवर मागे बसलेला त्याचा भाउ सुरेश आत्राम सह नागपुर वरून मोहपाकडे जाणारा बासपास रोडने जात होता. त्यादरम्यान अज्ञात लाल रंगाच्या कार चालक आरोपीने आपले वाहन भरधाव वेगाने निष्काळजीपणे चालवुन फिर्यादीचे मोपेड गाडीला मागुन धडक दिली. या अपघातात फिर्यादीच्या मागे बसलेला फिर्यादीचा भाउ नामे– सुरेश आंनदराव आत्राम (मृतक), वय ६४ वर्ष, रा. फुटाळा नागपुर असे दोघेही खाली पडले. फिर्यादीला गंभीर मार लागला असून फिर्यादीचा भाउ सुरेश आत्राम याला त्याचे डोक्याला मार लागला असुन गंभीर जखमी असुन बेशुध्द अवस्थेत होता. फिर्यादीचा भाउ सुरेश आत्रात याला ग्रामीण रूग्णालय येथे नेले असता उपचारादरम्यान कळमेश्वर येथील डॉक्टरांनी तपासुन मृत घोषीत केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे आरोपी चालकाविरुध्द कलम २७९,३३७,३०४ अ भादवी सहकलम १८४,१३४,१७७ मोवाका कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार प्रमोद तभाने मो.नं. ८६००४५८६७८ हे करीत आहे.

.
.
.
.

## . पळवून नेणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल

. **पो.स्टे. कन्हान –** दिनांक २०/१०/२०२२ चे ११.१५ वा. ते १८.०० वा. चे सुमारास पो.स्टे. कन्हान हद्दीत फिर्यादीयांची १६ वर्षीय अल्पवयीन मुलगी हीला अज्ञात आरोपीने फिर्यादीच्या कायदेशीर रखवालीतून फुस लावून पळवून नेले.

. सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. कन्हान येथे आरोपीविरुध्द कलम ३६३ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून सदर गुन्हयाचा पुढील तपास पोहवा सहारे मो. क्र. ९३०९९६६३९२ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**